# पर्यावरणविषयक जनसुनावणीचे इतिवृत्त

**प्रकल्प प्रवर्तक मे. लोकनेते बाबुराव पाटील ॲग्रो इंडस्ट्रीज लिमिटेड, लक्ष्मीनगर, मुक्काम पोस्ट - अनगर, तालुका - मोहोळ, जिल्हा - सोलापूर यांच्या कार्यरत प्रकल्पात ऊस गाळप क्षमता ४,००० मे.टनप्रतिदिन वरून ५,५०० मे.टनप्रतिदिन पर्यंत, सहवीज निर्मिती प्रकल्प - १४.५ मे. वॅटवरुन २४.५ मे. वॅट, मळीवर आधारित आसवणी प्रकल्प क्षमता ३०.० कि.लि. प्रतिदिन वरुन ६०.० कि.ली. प्रतिदिन विस्तारिकरण प्रकल्पाची पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी बाबतचा इतिवृतांत**

प्रकल्प प्रवर्तक मे. लोकनेते बाबुराव पाटील ॲग्रो इंडस्ट्रीज लिमिटेड, लक्ष्मीनगर, मुक्काम पोस्ट - अनगर, तालुका - मोहोळ, जिल्हा - सोलापूर यांच्या कार्यरत प्रकल्पात ऊस गाळप क्षमता ४,००० मे.टनप्रतिदिन वरून ५,५०० मे.टनप्रतिदिन पर्यंत, सहवीज निर्मिती प्रकल्प - १४.५ मे. वॅटवरुन २४.५ मे. वॅट, मळीवर आधारित आसवणी प्रकल्प क्षमता ३०.० कि.लि. प्रतिदिन वरुन ६०.० कि.ली. प्रतिदिन विस्तारिकरण प्रकल्पाची पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी दिनांक ०३ डिसेंबर, २०१९ रोजी सकाळी १२.०० वाजता स्थळावर आयोजित करण्यात आलेली होती.

सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांच्या कार्यालयीन आदेश क्र. ई-46 ,व्दारा पत्र क्रं.बीओ/जेडी/डब्लुपीसी/पीएच/बी- ४७/१ दिनांक २५ नोव्हेंबर, २०१९ अन्वये खालीलप्रमाणे पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी समिती गठित करण्यात आलीः-

१) जिल्हादंडाधिकारी, सोलापूर -**अध्यक्ष**
किंवा त्यांचे प्रतिनिधी
(अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी यांच्यापेक्षा
कमी दर्जाचा नसावा)

२) प्रादेशिक अधिकारी, - **सदस्य**
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, पुणे
(महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांचे प्रतिनिधी)

३) उप प्रादेशिक अधिकारी, -**समन्वयक**
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,
सोलापूर

श्री प्रशांत भोसले, प्रभारी उप प्रादेशिक अधिकारी, मप्रनि मंडळ, सोलापूर तथा समन्वयक, पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांनी सुरुवातीला सर्व उपस्थितांचे स्वागत केले व जनसुनावणी समिती अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी बाबतची प्रस्तावना विषद केली .

समन्वयक यांनी असे सांगितले की भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या दिनांक १४ सप्टेंबर, २००६ व सुधारित दिनांक १ डिसेंबर, २००९ च्या अधिसूचनेनुसार विशिष्ट प्रकल्पांना पर्यावरणविषयक अनुमती घेणे व त्यापुर्वी पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी आयोजीत करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे. श्री. भोसले यांनी असे सांगितले की उप प्रादेशिक कार्यालय, सोलापूर यांना प्रकल्प प्रवर्तक मे. लोकनेते बाबुराव पाटील ॲग्रो इंडस्ट्रीज लिमिटेड, लक्ष्मीनगर, मुक्काम पोस्ट - अणगर, तालुका -मोहोळ, जिल्हा -सोलापूर

यांच्या कार्यरत प्रकल्पात ऊस गाळप क्षमता ४,००० मे.टनप्रतिदिन वरून ५,५०० मे.टनप्रतिदिन, पर्यंत, सहवीज निर्मिती प्रकल्प - १४.५ मे. वॅटवरुन २४.५ मे. वॅट, मळीवर आधारित आसवणी प्रकल्प क्षमता ३०.० कि.लि. प्रतिदिन वरुन ६०.० कि.ली. प्रतिदिन विस्तारिकरण प्रकल्पाची पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी आयोजित करण्यासाठी अर्ज प्राप्त झाला . सदरहू प्रकल्पास भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाने दिनांक १९ जुलै, २०१८ रोजी प्रमाणित अटी व शर्तींच्या अधिन राहून प्रकल्पाबाबत पर्यावरण सर्वेक्षणास मान्यता प्रदान केलेली आहे. सदरहू प्रकल्प घोषित औद्योगिक विभागाच्या परिसराबाहेर कार्यान्वित असून प्रकल्प पर्यावरण अधिसूचना २००६ अन्वये संवर्ग संवर्ग अ 5 (जे) १ (डी) ५ (जी) मध्ये मोडत असल्याने त्यासाठी जाहिर जनसुनावणी घेणे बंधनकारक आहे .

पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणीचा मूळ उद्देश प्रकल्प परिसरातील सामान्य जनतेस प्रकल्पाविषयी व प्रकल्पामुळे होणारे परिणाम व त्याबाबत सामान्य जनतेच्या भावना जाणून घेणे, प्रकल्पात बंधनकारक असणा-या प्रदूषण नियंत्रण संयत्रणेची माहिती सामान्य जनतेस देणे व त्यांनी दिलेल्या सूचनेचा विचार करणे आहे.

त्यांनी सांगितले की अधिसुचनेनुसार मप्रनि मंडळाकडून एक महिना अगोदर पर्यावरण विषयक जाहीर लोकसूनावणीची सूचना स्थानिक वृत्तपत्र 'दैनिक संचार' व 'दैनिक लोकमत' मध्ये मराठीत व इंग्रजीत दिनांक ०३ नोव्हेंबर २०१९ रोजी प्रसिध्द करण्यात आलेली होती. त्यात सामान्य जनतेस उपरोक्त प्रकल्पाविषयी काही अपेक्षा, हरकती, सूचना असल्यास त्या लेखी स्वरुपात नोंदविण्याचे आवाहन करण्यात आले होते.

त्याचप्रमाणे नियोजित प्रकल्पाविषयीचा पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल व कार्यकारी सारांश अहवाल यांच्या प्रती भारत सरकारच्या पर्यावरण विभागीय कार्यालय, वने व हवामान बदल, मध्य-पश्चिम विभागपुर्व

तळमजला नविन सचिवालय इमारत 001 440 नागपूर, सिव्हील लाईन भाग मा. जिल्हाधिकारी - कार्यालयासमोर, मा. अतिरिक्त जिल्हाधिकारी कार्यालय- सोलापूर मुख्य कार्यकारी अधिकारी कार्यालय, जिल्हा परिषद - सोलापूर महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र- सोलापूर] तहसिदलदार, तहसील कार्यलय - मोहोळ, तालुका- मोहोळ, जि. सोलापूर, ग्रामसेवक/सरपंच, ग्रामपंचायत कार्यालय मौजे - बिटले, अनगर, कुरणवाडी, खंडोबाची वाडी, एकरुके, हिवरे, यावली, तालुका - मोहोळ, जि. सोलापूर, पर्यावरण विभाग महाराष्ट्र शासन, मंत्रालय मुंबई- महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ मुख्यालय - मुंबई, प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ पुणे, उप प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ सोलापूर येथे जनतेसाठी उपलब्ध करण्यात आलेले होते. समन्वयक यांनी असे सांगितले की, सदरहू प्रकल्पाबाबत एकही त्यांनी लेखी आक्षेप या  कार्यालयास प्राप्त झालेला नाही. उपस्थितांना त्यांचे काही आक्षेप, हरकती वा सुचना असल्यास ती संधी देण्यात आलेली असून त्या लेखी वा तोंडी स्वरुपात देऊ शकतात अशी सुचना केली. अध्यक्षांच्या परवानगीने त्यांनी प्रकल्प प्रतिनिधींना प्रकल्पाची माहिती उपस्थितांना देण्याबाबत सुचना केली.

श्री जगन्नाथ साळुंखे, प्रभारी प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, पुणे तथा सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांनी उपस्थितांचे स्वागत करुन माननीय अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांच्या वतीने प्रकल्प प्रवर्तकांच्या पर्यावरण सल्लागार यांना प्रकल्पाविषयी व पर्यावरण व्यवस्थापन योजनेविषयी सादरीकरण करण्याची सूचना केली.

प्रकल्पाच्या तांत्रिक सल्लागारांनी प्रस्तावित प्रकल्प व याबाबतच्या पर्यावरण विषयक उपाय योजनांची माहिती सादरीकरणाव्दारे उपस्थितांना दिली. त्यांनतर श्री. अजित देशमुख, अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहिर

लाकसुनावणी समिती यांनी उपस्थितांना त्यांचे काही आक्षेप, हरकती, सूचना असल्यास ते नोंदविण्याचे आवाहन केले.

**उपस्थित नागरिकांनी विचारलेले प्रश्न व त्यास प्रकल्प प्रतिनिधींकडून दिलेली उत्तरे याबाबतची माहिती पुढीलप्रमाणे आहे-**

**१) श्री. शहाजी गुंड, राहणार-अनगर, तालुका-मोहोळ, जिल्हा-सोलापूरः-**
प्रकल्प प्रवर्तक उत्पादनाची क्षमता वाढविणार आहेत. त्यामुळे अतिरिक्त सांडपाणीही निर्माण होईल. तरी संपूर्ण सांडपाण्यावर प्रक्रिया व व्यवस्थापन याबाबत काय उपाययोजना केलेल्या आहेत?

प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर दिले की साखर उत्पादन क्षमतेत वाढीमुळे अतिरिक्त सांडपाणी निर्माण होईल. एकूण ४४०.० घनमीटर प्रती दिन सांडपाण्याची निर्मिती होईल. सध्या औद्योगिक सांडपाणी प्रक्रिया सयंत्रणा कार्यन्वित असून कार्यरत औद्योगिक सांडपाणी प्रक्रियेत स्क्रीन, प्रायमरी क्लरिफायर व इक्वलायझेशन, एईरशेन टँक सेकंडरी इत्यादी विभाग असून ती ५००.० घनमीटर प्रतिदिन सांडपाण्यावर प्रकिया करु शकते. येणारे सांडपाणी गाळून सयंत्रणेत प्रक्रिया करुन अतिरिक्त एरीएशन वाढविण्यात येईल. त्यामुळे ऑक्सिजन पुरवठयात वाढ होईल. सदरहू सांडपाणी पारित केलेल्या मानंकानुसार म्हणजे निर्देशांनुसार बीओडी - १००.० मिलीग्रॅम प्रतिलिटर आणल्यावर त्याचा प्रकल्पात पुनर्वापर व हरितपट्टा विकासासाठी व ऊसशेतीसाठी करण्यात येणार आहे. सांडपाण्याचा एकही थेंब प्रकल्पाच्या बाहेर जाणार नाही. सदरहू प्रकल्प हा शुन्य द्रवनिसा:रण प्रकल्प (झिरो लिक्विड डिस्चार्ज) प्रकल्प असेल.

आसवणी प्रकल्पातील औद्योगिक सांडपाणी/स्पेंट वॉश एमईईव्दारे एकाग्र करुन त्याची क्षमता कमी करण्यात येईल. सदरहू स्पेंट वॉश इन्सिनरेशन बॉयलरमध्ये जाळण्यात येऊन शून्य द्रव निःस्सारण साध्य करण्यात येणार आहे.

२) <u>श्री. आबासाहेब बापू शिंदे, राहणार-अनगर, तालुका-मोहोळ, जिल्हा-सोलापूरः-</u>

सादरीकरणात दर्शविल्याप्रमाणे स्पेंट वॉश जाळण्यात येणार आहे. तर त्यापासून होणा-या हवा प्रदूषणाबाबत व स्पेंट वॉशपासून खतनिर्मती याबाबत आपण काय उपाययोजना केलेल्या आहेत?

पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर दिले की प्रकल्प प्रवर्तकांनी प्रथमदर्शनी असे धोरण स्विकारले आहे की उत्पन्न होणारा स्पेंट वॉश हा जाळण्यात यावा. मात्र जर सभासदांची व स्थानिकांची मागणी असल्यास उत्पन्न होणा-या स्पेंट वॉशच्या २५-३०% वर प्रक्रिया करण्यात येऊन त्यापासून खत तयार करता येईल व भविष्यात स्थानिक शेतक-यांची मागणी पूर्ण करता येईल.

३) <u>श्री. समाधान कारंडे, राहणार-यावली, तालुका-मोहोळ, जिल्हा-सोलापूरः-</u>

अतिरिक्त उत्पादनासाठी प्रकल्पास जादा/अतिरिक्त पाणी लागेल. ती गरज भागविण्यासाठी प्रकल्प प्रवर्तकांनी काय उपाय योजिलेले आहेत?

पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर दिले की प्रकल्पास महाराष्ट्र शासनाच्या पाटबंधारे विभागाची ३३०.० घनमीटर प्रतिदिन पाण्याची मान्यता आहे. सदरहू पाणी आष्टी धरणातून घेण्यात येते. प्रकल्पातील साखर उद्योगातील कन्डेनसेटवर प्रक्रिया करण्यात येईल. साखर उद्योगासाठी १५०.० घनमीटर प्रतिदिन पाण्याची गरज आहे. कन्डेनसेट पॉलिशींग युनिटमध्ये आसवणी प्रकल्पातील पाणी कन्डेनसेट करण्यात येईल. सदरहू प्रकल्प हा लवकरात लवकर कार्यान्वित करण्यात येणार आहे. उत्पन्न झालेले कन्डेनसेटवर प्रक्रिया करुन त्याचा उत्पादन प्रक्रियेत पुनर्वापर करण्यात येणार असल्याने जरी प्रकल्पात उत्पादनात वाढ होणार आहे, तरीही प्रकल्पास जादा/अतिरिक्त पाण्याची गरज इतर स्त्रोतातून भासणार नाही.

**४) श्री. शरद पंकज सलगर, राहणार-बिटले, तालुका-मोहोळ, जिल्हा-सोलापूरः-**

त्यांनी प्रश्न विचारताना सांगितले की प्रकल्पात स्पेंट वॉश जाळणार असल्याची माहिती देण्यात आली. मात्र स्थानिक शेतक-यांनी मागणी केल्यास एकूण स्पेंट वॉशच्या २५-३०% स्पेंट वॉश खतासाठी वापरण्यात येईल असे सांगितले. रासायनिक खताच्या किंमती पाहता स्पेंट वॉशपासूनचे खत हे शेतक-यांना निश्चितच परवडणारे आहे. त्यासाठी प्रकल्प प्रवर्तकांनी धोरण तयार करून शासनाची मान्यता मिळवावी.

त्यांनी पुढे प्रश्न विचारला की उत्पादनातील प्रक्रियेमुळे हवेचे प्रदूषण होईल का व असल्यास हवा प्रदूषण नियंत्रणासाठी कोणकोणते उपाययोजना करण्यात येणार आहेत?

प्रकल्प सल्लागार यांनी सांगितले की नविन प्रकल्पासाठी सद्या कार्यरत प्रकल्पातील बॉयलर वापरण्यात येतील. मात्र स्पेंट वॉश जाळण्यासाठी एक नविन बॉयलर खरेदी करुन कार्यान्वित करण्यात येईल व त्यास इलेक्ट्रो स्टॅटीक प्रेसिपरेटर ही आधुनिक सयंत्रणा बसविण्यात येईल. सदरहू सयंत्रणा ९९.०० % कार्यक्षमता दर्शविते. त्याचप्रमाणे सदरहू बॉयलरला चिमणी/धुराडे ही पारित केलेल्या निष्कर्षांनुसारच बसविण्यात येईल.

**५) श्री. रत्नाकर रामचंद्र नाईकनवरे, राहणार-हिवरे, तालुका-मोहोळ, जिल्हा-सोलापूरः-**

सदरहू विस्तारिकरणामुळे सभासदांना काय फायदा होणार आहे?

प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर दिले की सदरहू विस्तारीकरणासाठी कारखान्यास काही प्रमाणात खर्च करावा लागेल. मात्र विस्तारीकरणामुळे कारखान्याच्या नफ्यात निश्चितच वाढ होईल.

विस्तारिकरणामुळे प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष फायदे ब-याच प्रमाणात होतील. ऊसाला वाढीव दर व रोजगारात वाढ हा प्रत्यक्ष फायदा आहे.

विस्तारीकरणामुळे अप्रत्यक्ष फायदे भरपूर प्रमाणात आहेत. परिसरातील व्यवसाय व आर्थिक, शैक्षणिक क्षेत्रात भरपूरच फायदा होईल. छोटे-मोठे उद्योग, हॉटेल्स याच्यात वाढ होईल. परिसरातील आर्थिक स्थर उंचावण्यात मदत होईल. विस्तारिकरणामुळे शासनाच्या करसंकलनात वाढ होईल.

**६) श्री. पंडित रेवण्णा धवन,राहणार- एकरुखे, तालुका-मोहोळ, जिल्हा-सोलापूरः-**

प्रकल्प विस्तारिकरणाबरोबरच कामगारांच्या संख्येतही वाढ होणार आहे. तरी कामगारांच्या सुरक्षिततेसाठी कोणकोणत्या उपाययोजना योजण्यात आलेल्या आहेत?

प्रकल्प सल्लागार यांनी उत्तर दिले की प्रकल्प प्रवर्तक कामगारांच्या सुरक्षिततेसाठी सदोदित बांधिल आहे. कामगारांना प्रदूषणाचे त्रास होऊ नये म्हणून प्रकल्पात कामगारांना संरक्षणात्मक कपडे, हेल्मेट पुरविण्यात येते. त्याचप्रमाणे कॅन्टीन व प्रकल्प परिसरातील कामगारांना शुध्द पाणी उपलब्ध होण्यासाठी रिव्हर्स ऑस्समोसिस सयंत्रणा कार्यान्वित करण्यात आलेली आहे. कामगारांची नियमितपणे आरोग्य तपासणी घेण्यात येते. भविष्यातही ही धोरणे राबविण्यात येतील.

**७) श्री. सुनंदा रेड्डी, पर्यावरणवादी, अध्यक्ष, पर्यावरण परिरक्षणा संस्था, शिवाजीनगर, नालगोंडा जिल्हा, तेलंगण राज्यः-**

श्री सुनंदा रेड्डी यांनी प्रकल्प प्रवर्तकांचे विस्तारीकरण हाती घेतल्याबद्दल अभिनंदन केले. त्यांनी सांगितले की ते भारतातील पहिले पर्यावरणवादी आहेत की जे प्रकल्पास पाठिंबा देतात. भारतात १८ ते ३५ वयोगटातील सुमारे ४० कोटी बेकार असताना त्यांना नोकरीची संधि मिळणे गरजेचे आहे. प्रकल्पाच्या पर्यावरण सल्लागार यांनी पर्यावरणाचे योग्य प्रकारे सर्वेषण केले, त्याबद्दल त्यांनी पर्यावरण सल्लागार यांचे अभिनंदन केले. त्याचप्रमाणे

प्रकल्पाच्या १० कि. मी. परिघातील परिसराचे आरोग्य व शैक्षणिक सर्वेषण करण्याची सूचना केली. प्रकल्प प्रवर्तकांनी पावसाचे पाणी वाचविण्यासाठी मोठी साठवण टाकी बांधण्याची सूचना केली. स्थानिक युवक व युवतींना रोजगार मिळण्यासाठी सक्षम करण्यासाठी कौशल्य विकास कार्यक्रम हाती घेण्याची सूचना केली.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांनी त्यांना त्यांचे लेखी निवेदन द्यावे व त्याचे अवलोकन करण्यात येईल असे आश्वासन दिले.

श्री रेड्डी यांनी पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समितीस प्रकल्पास विना हरकत त्वरित मान्यता देण्याची सूचना केली. त्यांनी त्यांचे इंग्रजीतील निवेदन समितीस सादर केले.

प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर देताना सांगितले की पर्यावरण संरक्षण व संवर्धनासाठी, पावसाचे पाणी (रेन वॉटर) व भूजल संवर्धनासाठी श्री. रेड्डी यांनी केलेल्या सूचनांचे पालन करण्याचा प्रकल्प प्रवर्तक निश्चितच प्रयत्न करतील.

८) **<u>श्री. बाबासाहेव देवकर, व्यवसाय-शेती, राहणार-अनगर, तालुका-मोहोळ, जिल्हा-सोलापूरः-</u>**

प्रकल्प प्रवर्तकांनी प्रकल्पाचे विस्तारिकरण करण्याचे योजिलेले आहे. तर प्रकल्प प्रवर्तकांनी त्यासाठी लागणारा कच्चा माल/ऊस उत्पादन वाढीसाठी कोणकोणत्या उपाय योजना केलेल्या आहेत याची माहिती द्यावी.

प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की ऊसाचे उत्पादन वाढविण्यासाठी कारखाना निश्चितच मार्गदर्शन करु शकतो. चर्चासत्र (सेमिनार) व विविध ठिकाणी भेटी (फिल्ड व्हिझिट्स) आयोजित करण्यात

येतील. त्याचप्रमाणे संबंधित क्षेत्रातील तज्ज्ञांना बोलावून स्थानिक शेतक-यांना मार्गदर्शन करता येईल.

येथे प्रादेशिक अधिकारी, मप्रनि मंडळ, पुणे तथा सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांनी मत व्यक्त केले की स्थानिक शेतक-यांना उच्च प्रतीची ऊसबियाणे पुरविणे, स्थानिक शेतक-यांनी आधुनिक तंत्रज्ञान आत्मसात करण्यासाठी त्यांना प्रोत्साहन व प्रशिक्षण देणे हे पाडेगावच्या गाईडलाईन्सप्रमाणे आवश्यक आहे. सदरहू प्रकल्पामुळे सरपंच, उपसरपंच व स्थानिक शेतकरी यांना प्रकल्पामुळे कसा फायदा होईल ह्याबाबत अवगत करणे गरजेचे आहे. त्याचप्रमाणे प्रकल्पात किती खतनिर्मिती झाली व भविष्यात किती होईल याबाबत मार्गदर्शन होणे अत्यंत आवश्यक आहे. या सर्व मुद्द्यांवर प्रकल्प प्रवर्तकांनी स्थानिक शेतक-यांशी चर्चा करावी अशी सूचना सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी प्रकल्प प्रवर्तकांना केली.

९) **<u>श्री. शरद सलगर, माजी उपसरपंच, बिटले ग्रामपंचायत, तालुका-मोहोळ, जिल्हा-सोलापूरः-</u>**

प्रकल्पाबाबत सादरीकरण करण्यात आलेले आहे. त्यानुसार थोड्याप्रमाणात खर्च करुन उत्पादन क्षमता वाढविता येणार आहे. बराच वेळा गाळप हंगामात ऊसाची गरज भागल्याने/संपल्याने शेतक-यांचा ऊस विकला जात नाही. तो एप्रिल-मे महिन्यात घेतला जातो. मे महिन्यात वातावरणामुळे ऊसाचे पीक जतन करण्यासाठी भरपूर पाण्याची गरज लागते. सदरहू प्रकल्प विस्तारिकरणामुळे शेतक-यांचा ऊस हंगामात मोठ्या प्रमाणात विकला जाईल व भरपूर प्रमाणात पाण्याची बचत होईल.

त्याचप्रमाणे प्रकल्प प्रवर्तकांनी सहवीज प्रकल्पाचे विस्तारिकरण १४.५ मेगावॅट ते २४.५ मेगावॅटपर्यंत करण्याचे योजिलेले आहे. ती अतिरिक्त वीज

एमएसईबीच्या ग्रीडला देणार असल्याने स्थानिक शेतक-यांना योग्य प्रमाणात वीज उपलब्ध होईल.

आतापर्यंत सदरहू प्रकल्पाचा कोणताही त्रास स्थानिकांना झालेला नाही. शेतक-यांच्या हितासाठी सदरहू प्रकल्प असून तो त्वरित कार्यान्वित होणे गरजेचे आहे. प्रकल्प प्रवर्तकांनी पावसाचे पाणी संवर्धन/रेन वॉटर हार्वेस्टींग करण्याचे आश्वासन दिलेले आहे. त्यांनी सदरहू प्रकल्पास शुभेच्छा देताना पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समितीस सदरहू प्रकल्पास त्वरित मान्यता देण्याची विनंती केली.

येथे पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांनी सूचविल्याप्रमाणे प्रकल्पास लागणारा कच्चा माल म्हणजे ऊस कमी खर्चात जास्त उत्पादन होण्यासाठी सर्व कारखाना सभासदांनी शेतातील मातीचे परिक्षण करणे आवश्यक आहे. शेतातील जमिनीचा एनपीकेचा अभ्यास करुनच खत शेतात किती टाकावे हे ठरविणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे पाण्याचेही परिक्षण करणेही आवश्यक आहे. सदरहु माती व पाण्याचे परिक्षण करण्याची सुविधा कारखान्यात उपलब्ध असून ती वेळोवेळी पुरविण्यात येते.

त्याचप्रमाणे शेतक-यांना आधुनिक तंत्रज्ञान व साधने याची माहिती होण्यासाठी प्रकल्प प्रवर्तक वेळोवेळी सहकार्य करतील. त्यासाठी शेतक-यांची समिती तयार/गठित करुन प्रदर्शनास त्यांना नेणे, शेतक-यांना माहिती, प्रशिक्षण उपलब्ध करुन देणे यास प्रकल्प प्रवर्तक सहकार्य करेल. वीज, पाणी व खते कमी वापरुन उत्पादन वाढवणे व विन-विन परिस्थिती करणे यास प्रकल्प प्रवर्तक भविष्यात सहकार्य करेल.

१०) **<u>श्री. रविंद्र पांडुरंग पाचपूंड, राहणार-अनगर, तालुका-मोहोळ, जिल्हा-सोलापूरः-</u>**

मी स्थानिक शेतकरी व कारखान्याचा सभासद आहे. प्रकल्प विस्तारिकरणाबाबत सर्व माहिती सादरीकरणात योग्य प्रकारे दिलेली आहे. प्रकल्प प्रवर्तक प्रदूषण टाळण्यासाठी व प्रक्रियायुक्त सांडपाण्याचा प्रक्रियेत पुनर्वापर करण्याचा प्रयत्न करण्याची संपूर्ण माहिती सांगण्यात आलेली आहे. विस्तारिकरणासाठी अतिरिक्त ऊसाची गरज लागल्याने परिसरातील शेतक-यांचा मोठ्या प्रमाणात ऊस गळीतासाठी घेतला जाईल. त्यामुळे ऊसाच्या पीकाची नासाडी वाचविता येईल. विस्तारिकरणामुळे स्थानिक ऊस वाया जाणार नाही. ऊसाचे पुर्ण गाळप होईल. परिसराच्या सामाजिक-आर्थिक प्रगतीस हातभार लागेल. परिसरात आर्थिक सुबत्ता येईल. त्यांनी प्रकल्प प्रवर्तकांचे अभिनंदन करुन लवकरात लवकर प्रकल्प सुरु करण्याचे आवाहन केले.

११) **श्री. श्रीकांत जगन्नाथ घाटूळे, राहणार-अनगर, तालुका-मोहोळ, जिल्हा-सोलापूरः-**

त्यांनी सांगितले की ते स्थानिक शेतकरी आहेत. प्रकल्प प्रवर्तकांनी विस्तारिकरण योजिलेले आहे. मात्र दुष्काळ व अवर्षणामुळे ऊसाच्या उत्पादनावर निश्चितच परिणाम होतो व ऊस उत्पादन कमी होते. तरी प्रकल्प प्रवर्तकांचा ज्वारी व बीटपासूनही साखर उत्पादन करण्याचा विचार/धोरण आहे काय?

प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर दिले की सदरहू प्रकल्प हा ऊसापासून साखर निर्मिती व मळीवर आधारित आसवणी प्रकल्पाच्या तंत्रज्ञानावर आधारित आहे. ज्वारी व बीटाच्या रसापासून साखर निर्मितीसाठी वेगळे तंत्रज्ञान आहे. त्यासाठी उत्पादन सयंत्रणा ही वेगळी लागते. त्याचप्रमाणे साखरेचे प्रमाण ज्वारी व बीटाच्या रसापासून कमी आहे. मात्र तज्ञ समितीने याबाबत अहवाल उपलब्ध केल्यास सर्व विचार करुन प्रकल्प प्रवर्तक त्या बाबतीत भविष्यात सकारात्मक निर्णय घेतील.

समन्वयक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की सदरहू प्रकल्प विस्तारिकरणबाबत बैठकीत पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समितीस चार निवेदने प्राप्त झालेली असून त्यांनी प्रकल्प विस्तारिकरणास सहमती दर्शविलेली आहे. त्यापैकी श्री रेड्डी, पर्यावरणवादी, तेलंगण राज्य यांनी त्यांचे निवेदन बैठकीत वाचून दाखविलेले असून लेखी स्वरुपात सादर केलेले आहे. त्याचप्रमाणे तिघांनी लेखी स्वरुपात निवेदने सादर केलेली आहेत. त्यांची नावेः-

अ) चेयुथा रुरल एन्ड एन्व्हॉरमेंट डेव्हलपमेंट सोसायटी, नालगोंडा जिल्हा, तेलंगण राज्य,

ब) एन्व्हॉरमेंट पोल्युशन कंट्रोल सोसायटी,
हैद्राबाद, आंध्रप्रदेश

क) संकल्प स्वानंद सेवा संस्था,
नालगोंडा जिल्हा, तेलंगण राज्य

समन्यवयक यांनी सांगितले की वरील सर्व निवेदने बैठकीच्या इतिवृत्तासोबत शासनास सादर करण्यात येतील.

सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांनी बैठकीचा समारोप करताना सांगितले की बैठकीत स्थानिक शेतकरी, कारखाना सभासद व पर्यावरणवादी यांनी आधुनिकतेचा विचार करुन योग्य प्रकारे प्रश्न विचारले. बैठकीत उपस्थित करण्यात आलेल्या सूचना व त्यास दिलेली उत्तरे याचे इतिवृत्त मराठी व इंग्रजीत तयार करण्यात येईल व सदरहू प्रकल्पाविषयी बैठकीत प्राप्त झालेली निवदने अंतिम पर्यावरण मुल्यांकन अहवालासोबत महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण विभागातील तज्ज्ञ समितीस सादर करण्यात येईल. तज्ज्ञ समिती याबाबत योग्य तो निर्णय घेईल.

सदस्य्, पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांनी स्थानिक उपस्थित जनतेचे, प्रकल्प अधिका-यांचे आभार मानले व माननीय अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समितीच्या वतीने बैठक संपन्न् झाल्याचे जाहिर केले.

माननीय अध्यक्षांचे आभार मानून बैठक संस्थगित करण्यात आली.

**(प्रशांत भोसले),**

समन्वयक,

पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती

तथा

प्रभारी, उप प्रादेशिक अधिकारी,

मप्रनि मंडळ, सोलापूर

**(जगन्नाथ सांळुखे),**

सदस्य,

पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती

तथा

प्रादेशिक अधिकारी,

मप्रनि मंडळ, पुणे

**(अजित [illegible] देशमुख)**

**अध्यक्ष**

पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती

तथा

अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, सोलापूर

जिल्हा- सोलापूर